New Apostolic Church

# उपकारस्तुती २०२२

प्रिय बंधूनों आणि बहिणींनों,

जस जसा आपल्या चर्चचा उपकारस्तुतीचा दिवस, की जो रविवार, २ ऑक्टोबर २०२२ रोजी जवळ येत आहे, आम्हाला यावर मनन करण्याची एक संधी आहे की आम्ही कशासाठी आभारी आहोत: आमच्या विश्वासासाठी, कुटुंबासाठी, मित्रांसाठी, आणि आमच्या जीवनामध्ये आम्हाला जे अनेक विविध आशिर्वाद प्राप्त झालेले आहेत त्याच्यासाठी.

नेहमी आमचे आभारी असणे यामध्ये भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा समावेश आहे, ज्यामुळे आम्हाला देवाचे आभार मानण्यासाठी आधीच खुप कारणे उपलब्ध आहेत.

मला आपल्यासाठी हे आवडेल की आम्ही भविष्याकडे पाहावे की ज्यामध्ये आमच्या आभारी असण्यासाठी आणखी मोठे समर्थन आहे. आमच्या जीवनामध्ये आमच्याकडे जे काही आज आहे त्याची त्रैक्य देवाने आमच्या भविष्यासाठी जे राखून ठेवलेले आहे त्याच्याशी तुलना होवू शकत नाही. चला आम्ही देवाच्या तारणाच्या योजनेविषयी आणि देवाच्या मनात आमच्यासाठी आणि सर्व मानवजातीसाठी नेमके काय आहे याचा विचार करू. देव आपल्याला:

१) त्याच्याबरोबरच्या एका परिपूर्ण सहभागितेकडे घेऊन जाईल

२) संपूर्णत: परिपूर्ण-पुनरुत्थित शरीर प्रदान करील

३) ख्रिस्ताच्या बरोबरीने सेवा करण्याची परवानगी देईल

४) ख्रिस्ताप्रमाणे परिपूर्ण बनवेल-त्याच्या प्रतिमेत आणि त्याच्या स्वभावात

५) आपल्या प्रियजणांसोबत पुन्हा एकत्र जोडेल

६) सर्व दु:ख, दुखणे, पाप, दुष्टाई यापासून मुक्त करील आणि जेथे प्रीती राज्य करते तेथे परिपूर्ण शांती प्रदान करील

७) एक परिपूर्ण नवीन सृष्टी देईल

चला आपण वेळ काढूया आणि आमचे भविष्य, आमचा त्रैक्य देव, तारणाची योजना व याचा आमच्यासाठी आणि खरोखरच सर्व मानवजातीसाठी प्रत्येकाच्या नेमलेल्या वेळेस याचा अर्थ काय आहे याकरीता स्वत:ला खोलवर गुंतवून ठेवूया. देवाची प्रीती त्याच्या पुत्राला पाठविण्याद्वारे सिध्द झालेली आहे. येशू ख्रिस्त तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी मरण पावला आहे हे आपल्याला हे दाखविते की तो आम्हावर प्रीती करतो आणि त्याची योग्यता आणि गौरव तो आमच्यासह वाटून घेईल याचे अभिवचन देतो.

देव आपल्याला सर्वकाही देऊ इच्छितो आणि आपले भविष्य सुरक्षित करू इच्छितो आणि प्रत्यक्षात त्याबदल्यात तो फारच कमी मागतो, आपल्याकडून कोणताही मोठा त्याग मागितला जात नाही, फक्त आमचा विश्वास, भरवसां आणि आमची त्याच्यासाठी असणारी प्रीती.

जेव्हा आमच्या प्रीतीत ओलावा असतो तेव्हा डिव्हाइन सर्व्हिसेसमधील सहभागितेत एकत्र येणे हे आम्हाला कष्टदायक असे जाणवत नाही, आम्हाला देवाप्रती आणि आमच्या शेजाऱ्याप्रती आमची प्रीती ठोसरितीने व्यक्त करण्याचे वेगवेगळे मार्ग सापडतात आणि आम्ही आमच्या देणग्यांसह देवाची सेवा करण्यात सक्रिय असतो.

''ख्रिस्तामध्ये एकत्र असणे'' हे एखाद्या वार्षिक ध्येय वाक्यापेक्षाही अधिक असे आहे. टप्प्याटप्प्याने कोण, काय आणि कोठे आपल्याला एकत्र व्हायचे असे ते आहे. ते भूतकाळ आहे, वर्तमान आहे आणि हेच भविष्य आहे की जेथे आपण सर्वदा ख्रिस्ताबरोबर एका परिपूर्ण स्थितीत एकत्र राहू.

तुम्हाला अणि तुमच्या प्रियजनांना उपकारस्तुतीचा दिवस आशिर्वादीत असो.

मार्क वोल